# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/09/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या दोन टिप्पर चालकाविरूद्ध

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक २०/०९/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन कुही परीसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहीती मिळाली की, पाचगाव फाटा येथे अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशी माहिती मुखबीरद्वारे मिळाल्याने नमुद घटनास्थळावर नाकाबंदी केली असता, १) टिप्पर क्र. MH40 CM 6276 २) टिप्पर क्र. MH40 CD 6276 येतांनी दिसले. ट्रकचा चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात **आरोपी नामे— १) नितेश मालोडे वय ३० वर्ष, रा. निलज ता. पवनि २) विशाल मोहोडकर, वय ३० वर्ष, रा. धुरखेडा ता. उमरेड** हे रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून १) टिप्पर क्र. MH40 CM 6276 २) टिप्पर क्र. MH40 CD 6276 प्रत्येकी २०,०००००/— रु प्रमाणे एकूण ४०,०००००/— रु ट्रक मध्ये असलेली १६ ब्रास रेती प्रत्येकी ६०००/— रु ब्रास एकूण किंमती ९६०००/— असा एकूण ४०९६०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी, जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रियेकरीता पोलीस ठाणे कुही दुरक्षेत्र पाचगाव चौकी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोहवा मयुर ढेकळे, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, अरविंद भगत, मयूर ढेकले, मिलिंद नांदूरकर, पोलीस अंमलदार राकेश तालेवार यांचे पथकाने केली.

## जबरी संभोग

१) पो.स्टे. सावनेर :— दिनांक २५/०४/२०२३ चे १५/३० वा. ते दिनांक १३/०८/२०२३ चे मध्यरात्री ०२/०० वा. ते ०३/०० वा. सुमारास फिर्यादी पिडीत मुलगी अल्पवयीन असुन ती **आरोपी नामे— कुमार वासुदेव येवले, वय २७ वर्ष, रा. प्लाट नं. २२७ बि संतोशि नगर पिपळा रोड हुडकेश्वर पोस्टे च्या मागे नागपुर** याची साळी लागत असुन त्याने तिला तिचे बॉयफ्रेंड बद्दल विचारणा करून फिर्यादीने आरोपीला आपला असलेल्या बॉयफ्रेंड बद्दल माहीती दिल्याने आरोपीने तिला तु मला जवळ घे फिजिकल हो त्याचे मोबाईलमध्ये असलेले न्युड फोटो काढुन मी तुझे आई वडीलांना दाखविल अशी धमकी देवुन जबरदस्तीने तिचे राहते घरी वारंवार शारीरीक संबंध केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(Q)376(2)(u ) ५०६ भादवी सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक मोकासे मॅडम पोस्टे सावनेर मो. नं. ८३८०८५०३५० या करीत आहे.

२) पो.स्टे. मौदा :– दिनांक १५/०९/२०२३ चे २३.०० वा. ते दिनांक १९/०९/२०२३ चे १८.०० वा. सुमारास **आरोपी नामे– राजु उर्फ राजेश राघोबा बेले, वय ५३ वर्षे, रा. सावळी, तह. कामठी** हा फिर्यादीचा दुसरा पती असून यातिल पिडीता वय १४ वर्ष हि फिर्यादीची सख्खी मुलगी आहे. यातिल पिडीता हि आपले घरी झोपली असतांना तिचा आरोपीने विनयभंग केला. तसेच पिडीता घरी एकटी असतांना तिचे सोबत बळजबरीने बलात्कार केला व कुणालाही सांगितले तर फिर्यादी व पिडीता हिला जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ३७६(३), ५०६ भा.दं.वि. सहकलम ४, ६, ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक निशा भूते या करीत आहे.

३) पो.स्टे. कोंढाळी :– दिनांक ०५/०२/२०२३ चे २०/०० वा. ते दिनांक ०९/०९/२०२३ चे २२/०० वा. दरम्यान फिर्यादी हीने दिनांक १२/०९/२०२३ रोजी पोस्टे गणेशपेठ नागपुर शहर येथे तक्रार दिली की, आरोपी आकाश ठाकुर वय २६ वर्ष रा. बेलोना ता. नरखेड जि. नागपुर याने फिर्यादीला लग्नाचे आमिश दाखवुन कोंढाळी येथील व गणेशपेठ व सिताबर्डी, नागपुर शहर येथील वेगवेगळे ठिकाणी नेउन तिचे इच्छेविरूध्द शारिरीक संबंध प्रस्थापित केल्याचे तक्रारीवरून पोस्टे गणेशपेठ नागपुर शहर येथे आरोपी आकाश ठाकुर वय २६ वर्ष रा. बेलोना ता. नरखेड जि. नागपुर विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीने फिर्यादमध्ये दर्शविलेले घटनास्थळ पोस्टे कोंढाळी हद्दीतील असल्याने गणेशपेठ नागपुर शहर येथुन पोस्टे कोंढाळी येथे गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२)(एन) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि पंकज वाघोडे मो. क्र ७३०४२१०७२४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर